# प्रकरण -2 (पुस्तिका -1)

## उप प्रमुख अभियंता (पापुप्र ) नियोजन व संकल्पचित्रे

संस्थेची विशिष्ट कार्यपद्धती आणि कर्तव्ये,यांचा तपशील

**2.1** सार्वजनिक प्राधिकरणाचा हेतू /उद्दीष्टे:

मुंबई शहराच्या स्थानिक पाणी पुरवठयाच्या वाढीसाठी व वितरणासाठी अभिज्ञात असलेल्या योजनांचे नियोजन व संकल्पचित्रे तयार करणे.

**2.2** सार्वजनिक प्राधिकरणाचे अभियान / दृष्टीकोन:

सेवा जलाशयामार्फत मुंबई शहराला स्वच्छ व पिण्यायोग्य पाणी पुरवठयात वाढ करणे.

**2.3** इतिहास आणि संदर्भित माहिती :

मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येमुळे पाण्याची स्थानिक मागणी वाढली व त्यामुळे मुंबई शहराच्या पाणी पुरवठयात वाढ करण्यासाठी पाणी पुरवठा योजना हाती घेण्याची आवश्यकता भासली ह्या योजनांच्या विविधप्रकल्पाच्या पूरक बाबींच्या नियोजन, संकल्पचित्रे व निविदा संबंधी 1970 सालच्या जवळपास उपप्रमुख अभियंता (पाणी पुरवठा प्रकल्प) नियोजन व संकल्प चित्रे यांच्या अधिकारा खाली वेगवेगळया विभागाची स्थापना करण्यात आली. उपप्रमुख अभियंता (पाणी पुरवठा प्रकल्प) नियोजन व संकल्प चित्रे यांना कार्यकारी अभियंता (नियोजन), कार्यकारी अभियंता (संकल्प चित्रे) आणि कार्यकारी अभिंयंता (नि.व सं.) हे सहाय्यकरित आहेत.

**2.4** कर्तव्ये :

पाणी पुरवठयाच्या योजनांच्या अंमलबजावणीसाठी विविध कामांचे नियोजन करणे व संकल्पचित्रे तयार करून निविदा मागविणे. सेवाजलाशय व वाहिन्यांचा, अनुसूचीत बाबी व त्यांचे दर यांची रास्त बाजारभाव सूची तयार करणे. सदर कामे विभागांतील तज्ञ व्यक्तिंकडून करवून घेण्यात येतात.

**2.5** मुख्य कामे / कार्य :

पाणी पुरवठा प्रकल्प विभागातर्फे अंमलबजावणी केल्या जाणा-या स्थानिक पाणी पुरवठयाच्या वाढीसाठी आणि वितरणासाठी आवश्यक असणारी विविध कामे म्हणजेच जलवाहिन्या, सेवा जलाशय इत्यादींचे नियोजन, संकल्पचित्रे तयार करणे व निविदा मागविणे.

**2.6** पुरविण्यांत येणा-या सेवांची सूचि :

नवीन प्रेषण जलवाहिन्या व सेवा जलाशयांच्या कामांसाठी इ. तसेच जुन्या पारेषण जलवाहिन्या व सेवा जलाशयांच्या नूतनीकरण/ बदलीच्या कामांसाठी सविस्तर वास्तुशास्त्रीय, सलोह सिमेंट क्रॉक्रीट/संरचात्मक संकल्पचित्रे आणि आराखडे तयार करणे, सविस्तर अंदाजपत्रक व वाजवी बाजार दर सूची तयार करणे, विनिर्देश तयार करणे, निविदा मागविणे.

**2.7** संस्थेच्या बांधणीचा आकृतीबंध



**2.8** <u>जनतेकडून अपेक्षा :</u> आधारसामग्री संग्रह/सर्वेक्षण करतांना जनतेने सहकार्य करणे.

**2.9** <u>जनतेच्या सहभागासाठी व्यवस्था :-</u> लागू नाही.

**2.10** <u>सेवा पुरविण्यासाठी आणि नागरिकांची गा-हाणी सोडविण्यासाठीची संरचना</u> :- लोकांची तक्रार आल्यास, त्यांचे निराकरण खात्यातर्फे केले जाते.

सही/-
१४.०९.२०१६
प्रशासकीय अधिकारी (पा.पु.प्र)
नि.व सं.चित्रे